# महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे -०४

## प्रसिध्दीपत्रक

## शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र परीक्षा - टंकलेखन

## (GCC) जून - २०२५ निकाल

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र परीक्षा (GCC) टंकलेखन जून -२०२५ दिनांक ११/०६/२०२५ ते १२/०६/२०२५ या कालावधीत घेण्यात आलेली आहे.

सदर परीक्षेचा निकाल दिनांक २०/०८/२०२५ रोजी ऑनलाईन पध्दतीने जाहीर करण्यात येत आहे.या परीक्षेचा निकाल विद्यार्थ्यांना परिषदेच्या www.mscepune.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. विद्यार्थ्यांना गुणपत्रकांची ऑनालाईनप्रिंट घेता येईल.

विद्यार्थ्यांचीप्रमाणपत्रे/ गुणपत्रके डिजीटल स्वाक्षरीने ऑनलाईन स्वरुपात संबंधीत संस्थांच्या लॉगीनला उपलब्ध करुन देण्यात येतील. सदरील प्रमाणपत्रांची छपाई संस्थांनी कलर प्रिंटद्वारे100 जीएसएम (GSM) कागदावर करुन विद्यार्थ्यांना वितरीत करावे. तसेच संबंधीत विद्यार्थ्यास सॉफ्टकॉपी PDF स्वरुपात देण्यात यावी. जेणे करुन विद्यार्थ्यांना भविष्यात प्रमाणपत्राच्या आवश्यकते नुसार सदरील प्रमाणपत्र कलर प्रिंटद्वारे 100 जीएसएम (GSM) कागदावर छपाई करुन घेता येईल. संस्थांनी संबंधीत विद्यार्थ्यास प्रमाणपत्र/गुणपत्रके वितरीत केलेली पोहोच दप्तरी जतन करुन ठेवावी.

निकाल जाहीर झालेल्या दिनांकापासून १० दिवसात परीक्षार्थीने गुणपडताळणी व उत्तरपत्रिकेच्या छायांकित प्रतीसाठी संस्थेतून विहित नमुन्यात ऑनलाईन अर्ज करणे आवश्यक आहे. गुणपडताळणीसाठी प्रति विषय रुपये १००/- प्रमाणेव छायाप्रतीसाठी मिळण्यासाठी प्रति विषय रुपये ४००/- प्रमाणे रक्कम ऑनलाईन पध्दतीने दिनांक ३०/०८/२०२५ पर्यंत भरण्यात यावेत. गुणपडताळणी व छायाप्रती प्राप्त झाल्यानंतर कार्यालयीन पाच दिवसात पुर्न-मुल्यांकनासाठी प्रती विषय रु.६००/- प्रमाणे ऑनलाईन पध्दतीने रक्कम भरुन अर्ज करावेत. यानंतर आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.याबाबतच्या सविस्तर सूचना परिषदेच्या www.mscepune.in या संकेतस्थळावर देण्यात आल्या आहेत.

**निकालाची संक्षिप्त माहिती**

| परीक्षेचे नांव | परीक्षेस प्रविष्ठ विद्यार्थी | उपस्थित विद्यार्थी | अनुपस्थित विद्यार्थी | उत्तीर्ण विद्यार्थी | अनुत्तीर्णविद्यार्थी | राखीव विद्यार्थी | निकाल रद्द विद्यार्थी | शेकडा निकाल (उपस्थिती अनुसरून) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| GCC (टंकलेखन) | २१०७ | १३५७ | ७५० | ६२७ | ७२८ | ०२ | ० | ४६.२०% |

(अनुराधा ओक)
आयुक्त,
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
पुणे-४